बातमी/ 3 /        /२०२५                                        दि. २८/०२/२०२५

DEVGAD COLLEGE

प्रति,

मा. संपादक,/ वार्ताहर,

साप्ताहिक/दैनिक-

देवगड/जामसंडे कार्यालय, खडपकर बुक स्टॉल/ डॉ. आपटे कंपाउंड

महोदय,

सोबतचा मजकूर आपल्या अंकात बातमी म्हणून द्यावा ही विनंती.

## देवगड महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात संपन्न

**श्री. स. ह. केळकर वरीष्ठ महाविद्यालय व श्रीम. न. शां. पंतवालावलकर कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात गुरुवार २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात संपन्न झाला. यावेळी कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस साजरा झाला. प्राचार्य प्रा. डॉ. विजयकुमार कुनूरे यांच्या हस्ते रसराज विभागातील मराठी भाषा दिन विशेषांकाचे उद्घाटन करण्यात आले. कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. निबंध स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषा साहित्य व कुसुमाग्रज यांच्या कार्याचा आढावा आपल्या भाषणातून सादर केला. प्रा. धनंजय पन्हाळकर यांनी अभ्यासपूर्ण भाषण केले. प्रा. डॉ. विजयकुमार कुनुरे यांनी सर्वाना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनाली गावकर, प्रास्ताविक प्रा.राजेश तेली, आभार प्रा. संतोष गिडये यांनी व्यक्त केले.**

**याप्रसंगी प्रा. डॉ.विजयकुमार कुनुरे, उपप्राचार्य प्रा. शिरसाटे, प्रा. सुरवसे, उपप्राचार्य प्रा. डॉ. शरद शेटे, पर्यवेक्षक प्रा. बांदेकर, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.**

देवगड कॉलेज